**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२, दिनांक २३ मे २००३

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१.**

क्रमांक मत्स्यवि-१००२/१२८९८/(८१)/पदुम-१४,-- महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सन १९८१ चा महा.५४) च्या कलम १८ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन रत्नागिरी जिल्हयातील दापोली, गुहागर व राजापूर या तालुक्याच्या संबंधित क्षेत्रासाठी तीन एकसदस्य अपिल मंडळे स्थापन करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जे. पी. डांगे

शासनाचे प्रधान सचिव,